

# महाराष्ट्र शासन
# सार्वजनिक बांधकाम विभाग

## पत्तन अभियंता,
## सिंधुदुर्ग पत्तन विभाग, कुडाळ,
## मु.सिंधुदुर्गनगरी.

# नागरिकांची सनद

# २०१८







# सुची


| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | प्रस्तावना | १ ते २ |
| २ | विभागाची बांधिलकी व नागरिकांची जबाबदारी | ३ ते ४ |
| ३ | विभागाची रचना | ५ ते ६ |
| ४ | विभागीय कार्यालयाचे कार्यक्षेत्र | ७ ते ८ |
| ५ | गाऱ्हाणी / तक्रारी यांचे निराकरण | ९ |
| ६ | सनदेची अंमलबजावणी | १० |
| ७ | परिशिष्टे - अ | ११ |

## १. प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासनाचा सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत मुख्य अभियंता, (वि.प्र) सा.बां.विभाग, मुंबई हा प्रादेशिक विभाग येत असुन त्या विभागातर्गंत किनारी अभियंता, मुंबई हे मंडळ कार्यालय कार्यरत आहे. सदर मंडळ कार्यालयातर्गंत तीन विभाग कार्यरत असुन त्यापैकी सिंधुदूर्ग जिल्हयासाठी सिंधुदूर्ग पत्तन विभाग या नावाने दिनांक १०/०८/१९८१ पासुन निर्माण करण्यात आला. तत्पुर्वी हा विभाग गृह खात्यांतर्गत मत्स्य प्रकल्प विभाग (मिरकरवाडा) रत्नागिरी येथे कार्यरत होता. या विभागाकडून मिरकरवाडा प्रकल्पाचे काम पुर्ण झाले व त्याच दरम्यान रत्नागिरी जिल्हयाचे विभाजन होऊन स्वतंत्र सिंधुदूर्ग जिल्हयाची निर्मिती झाली. त्यावेळी रत्नागिरी येथे रत्नागिरी जिल्हयासाठी पत्तन अभियंता यांचे स्वतंत्र कार्यालय असल्याने सिंधुदूर्ग जिल्हयासाठी सिंधुदूर्ग पत्तन विभाग म्हणून दिनांक १०/०८/१९८१ पासुन स्वतंत्र कार्यालय अस्तित्वात आले. हा विभाग नागरिकांना खालील सुविधा पुरविण्यास बांधिल आहे.

सार्वजनिक सेवा तत्परतेने, सौजन्य पूर्वक व सन्मानपुर्वक वागणुक मिळून उपलब्ध व्हाव्यात व नागरिकांचे सामाजिक प्रश्न सहानुभूतीपुर्वक सोडवावेत हा दृष्टीकोन विचारात घेऊन तसेच सर्वसामान्य नागरीकांसाठी ही “ **नागरीकांची सनद** ” तयार करण्यात आली आहे.

१. धुप प्रतिबंधक बंधारे, जेट्टी, प्रवासी निवारे, मासे सुकवण्याचे कट्टे, मासेमारी बंदरे व मत्स्यबंदर विकसित करणे, चक्रीवादळ धोका निवारा केंद्र बांधणे, पर्यटनविषयक कामे व नियतकालीक देखभाल व दुरुस्ती , उपलब्ध होणाऱ्या निधीतून प्रभावीपणे करणे व सेवा सुविधांचा स्तर उंचावत नेणे.

२. शासकिय नवीन बांधकामे उत्तम गुणवत्तेची, टिकाऊ, सुरक्षित, अत्यावश्यक, सुविधायुक्त, सौंदर्यपूर्ण व सभोवतालचा परिसर सुशोभित करणारी अशी करणे.

३. इतर सर्व शासकीय विभागांना आवश्यक असेल तेव्हा तांत्रिक सल्ला देणे.

४. आपत्कालीन व्यवस्थेसाठी तत्परतेने स्थापत्य अभियांत्रिकीशी संबंधित आवश्यक ती काम करणे व मदत करणे.

५. या विभागातील व विभागाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालयातील कर्मचारी वर्गाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या समजावून सांगणे.

६. या विभागातील व विभागाच्या अखत्यारीतील प्रत्येक कार्यालयात ठरवून दिलेल्या दिवशी व वेळी सर्वसामान्य जनतेची गाऱ्हाणी / तक्रारी ऐकणे व त्यांचे प्रभावीपणे निराकरण करणे.

७. **"माहितीचा अधिकार अधिनियम"** अंतर्गत मागितलेली माहिती संबंधितांना विहित मुदतीत उपलब्ध करुन देणे.

९. नागरिकांच्या सनदेस व्यापक प्रसिध्दी देणे.

१०. संगणकिकरणाबाबत सर्व विभागीय कार्यालये, मंडळ कार्यालये, प्रादेशिक कार्यालये तसेच मंत्रालय यांना नेटवर्कने जोडून आवश्यक माहिती उपलब्ध होण्यासाठी प्रयत्नशिल राहणे.

११. शासकिय कामकाजात सुसूत्रता ठेवणे.

१२. विभागाची विविध माहिती www.mahapwd.com या वेबसाईट वर अद्यावत उपलब्ध करणे.

**२. (१) बांधिलकी :-**

वरील सर्व कर्तव्ये पार पाडताना सिंधुदूर्ग पत्तन विभाग

अ) पारदर्शकता व निष्ठा ठेवील.

ब) सौजन्यपूर्ण व मदतीची वृत्ती ठेऊन कामाचा वेळेत निपटारा करेल.

क) सेवेच्या गुणवत्तेची बांधिलकी ठेवील.

## (२) नागरिकांची जबाबदारी :-

* नागरिकांकडून आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपूर्णरित्या मिळावी.

* शासकिय अधिकारी/कर्मचारी यांचेशी नागरकिांची वर्तणूक सौजन्यपुर्वक असावी.

* नागरिकांनी सार्वजनिक हित, एकात्मता व अखंडता जोपासण्यासाठी सहकार्य करावे.

* नागरिकांचा प्रतिसाद विकासाला मदत करणारा असावा.

* विहित केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीतसेवा पुरविण्याचा आग्रह धरु नये.

* सार्वजनिक मालमत्तेची व्यवस्था पाहण्यास सहकार्य करावे.

* नागरिकांनी स्वेच्छेने अतिक्रमणे दूर करावीत व पुन्हा सरकारी जागांवर अतिक्रमणे करु नयेत.

* मत्स्यबंदर बांधणे, समुद्र किनाऱ्यावरील बंधारे , जेट्टी व प्रवासी निवारे यांची जतन ही नागरिकंची जबाबदारी राहिल.

* नागरिकांनी कायदेशीर तरतुदी, नियम, अलिखित संकेत यांचे पालन करावे.

## (३) सार्वजनिक बांधकाम विभागाची रचना :-

शासन स्तरावर मा. मंत्री ( सार्वजनिक बांधकाम ), तसेच मा.राज्यमंत्री (सार्वजनिक बांधकाम) यांचे अधिपत्याखाली विभागाचे दोन सचिव/सचिव(रस्ते) व सचिव (बांधकामे) हे सर्वोच्य प्रशासकिय अधिकारी आहेत.

शासन स्तरावर विविध धोरणात्मक निर्णय, विभागांचा अर्थसंकल्प, बंदर, मत्स्य प्रकल्प, समुद्रकिनाऱ्यावरील बंधारे , जेट्टी व प्रवासी निवारे, मासळी सुकविण्याचे ओटे, पर्यटनविषयक कामे इत्यादी चे बांधकाम, देखभाल/दुरुस्ती इत्यादी बाबी हाताळल्या जातात.

प्रादेशिक स्तरावर मुख्य अभियंता (विशेष प्रकल्प) सां.बा.विभाग, मुंबई हे सर्वोच्य तांत्रिक अधिकारी आहेत. त्यांचे मुख्यालय मुंबई या ठिकाणी कार्यरत आहे. प्रादेशिक विभागांतर्गत कामांची अंमलबजावणी मुख्य अभियंता स्तरावर केली जाते.

प्रादेशिक स्तरावर मुख्य अभियंता (विशेष प्रकल्प) सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांच्या अखत्यारीतील किनारी अभियंता, मुंबई हे मंडळ कार्यालय कार्यरत आहे. किनारी अभियंता, मुंबई यांचे अधिपत्याखाली एकूण तीन कार्यकारी/ पत्तन अभियंता कार्यरत आहेत. या विभागाला त्यांचे प्रत्येकाचे कार्यक्षेत्र अखत्यारित सिंधुदूर्ग जिल्हा आहे, त्या जिल्हयासाठी मर्यादीत आहे. सर्वसाधारणपणे प्रत्येक तालुक्यास उप अभियंता/ सहाय्यक पत्तन अभियंता असतो.

**या विभागांतर्गत खालील ४ उपविभाग कार्यरत आहेत.**

१) सहाय्यक पत्तन अभियंता, पत्तन उपविभाग, देवगड.

२) सहाय्यक पत्तन अभियंता, पत्तन उपविभाग, मालवण.

३) सहाय्यक पत्तन अभियंता, पत्तन उपविभाग,वाघोटन मु.कुडाळ.

४) सहाय्यक पत्तन अभियंता, पत्तन उपविभाग, वेंगुर्ला.

अशी एकूण चार उपविभाग कार्यरत असून या विभागाच्या कार्यक्षेत्राचा नकाशा व त्याचे कार्यक्षेत्र दर्शविणारा वृक्ष तक्ता (Tree Chart) सोबत जोडला आहे.**(परिशिष्ट "अ")**

## ४. विभागीय कार्यालयाचे कार्यक्षेत्र व माहितीची सुलभता :-

### अ) कार्यालयाचे कार्यक्षेत्र :-

या कार्यालयाचे कार्यक्षेत्र सिंधुदूर्ग जिल्ह्यासाठी मर्यादित आहे. या जिल्ह्याची १२० कि.मी. लांबीची समुद्रकिनारपट्टी असुन या विभागांतर्गत मालवण/देवगड/वेंगुर्ला/वाघोटण या उपविभाकडुन सदर जिल्ह्यातील किनारपट्टीवरील कामे केली जातात. या विभागांतर्गत समुद्र धुपप्रतिबंधक बंधारे, जेट्टी, मासे सुकविण्याचे ओटे, प्रवासी निवारे, शेड, संरक्षक भिंत, मत्स्यव्यवसायासाठी मुलभूत सुविधा पुरविणे, पर्यटन विषयीची कामे, राष्ट्रीय चक्रीवादळ निवारे केंद्र अशा प्रकारची बांधकामे केली जातात.

**तसेच सिंधुदूर्ग जिल्ह्यातील आनंदवाडी ता.देवगड येथील मत्स्यव्यवसाय प्रकल्प हा जिल्ह्यातील सर्वात मोठा प्रकल्प असुन या विभागांतर्गत कार्यरत आहे. सदर प्रकल्पासाठी राज्य व केंद्र शासनाकडुन सुधारित प्रशासकिय मान्यता मिळाली असुन ग्रामस्थांनी बंद केलेले काम सुरु करण्याची कार्यवाही चालु आहे.**

**तसेच राष्ट्रीय चक्रीवादळ निवारा प्रकल्प अंतर्गत सिंधुदुर्ग जिल्हामध्ये मालवण तालुक्यातील काळेथर व आचरा तसेच देवगड तालुक्यातील जामसंडे व विजयदुर्ग या ठिकाणी निवारा केंद्र उभारणेचे प्रस्तावित आहे.**

**समुद्र धुपप्रतिबंधक बंधारा बांधणे ही योजना महाराष्ट्र मेरी टाईम बोर्ड, मुंबई यांचेकडुन या विभागाकडे हस्तांतरीत करण्यात येऊन  त्यांचेकडील १३ वा वित्त आयोगाची ७ कामे करण्यात आली आहेत तसेच राज्य योजनेअंतर्गत सन २०१६-१७ साठी १३ कामे व सन २०१७-१८ साठी ८ कामे मंजुर असुन पर्यावरण विभागाच्या मंजुरीअभावी सुरु नाहीत.**

**प्रादेशिक पर्यटनअंतर्गत निवती रॉक, ता.वेंगुर्ला येथे जेट्टी व जोडरस्त्याचे काम करण्यात येत आहे.**

प्रस्तावनेत नमुद केलेल्या सार्वजनिक सेवा सार्वजनिक बांधकाम विभाग पुरवित असतो. कामांच्या अमंलबजावणीसाठी सार्वजनिक बांधकाम नियमावली, लेखा संहिता, विनिर्देश, वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके इ. चे काटेकारपणे पालन क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडुन केले जाते.

**(ब) माहितीची सुलभता :-**

विभागाचे वेबसाईटवरुन (संकेत स्थळावरुन) तसेच वेळोवेळी प्रसिध्द केल्या जाणाऱ्या पत्रकाव्दारे जनतेला आकडेवारीचा तपशील सुलभतेने उपलब्ध होईल.

## ४. <u>गाऱ्हाण्यांचे निराकरण सनदेचा आढावा, व जनसामान्यांची छाननी.</u>

### अ) <u>गाऱ्हाणी/तक्रारी यांचे निराकरण :-</u>

कार्यपुर्तीस होणारा विलंब वा अन्य काही गाऱ्हाणी विभागाबाबत अथवा काही कामाबाबत तक्रारी असतील तर, ते गाऱ्हाणी/तक्रारी त्या कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालयाकडे मांडावे. उदा. नागरिकांना उपविभागीय कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे/तक्रार असल्यास विभाग कार्यालयप्रमुखाकडे म्हणजे कार्यकारी अभियंता/पत्तन अभियंता यांचेकडे गाऱ्हाणे मांडावे व विभाग कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे/तक्रार असल्यास मंडळ कार्यालयाच्या अधीक्षक अभियंत्याकडे/किनारी अभियंताकडे गाऱ्हाणे मांडावे. अशा गाऱ्हाणी/तक्रारींचे निराकरण वरिष्ठ कार्यालयाकडून ७ दिवसात करण्यात येईल.

नागरिक गाऱ्हाणी समक्ष भेटीत अथवा पत्राने मांडू शकतात.

### ब) <u>नागरिकांच्या सनदेचा आढावा/सिंहावलोकन</u> :-

या विभागाच्या ‘नागरिकांचा सनदेच्या’उपयुक्ततेबाबतचा तथा परिणामकारकतेचा आढावा या विभागाकडून घेण्यात येईल.

**क) जनसामान्यांकडून सुचना :-**

या विभागाची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमुल्य सूचनांचा गांभिर्यपूर्वक विचार करुन, त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येईल. ही नागरिकांची सनद स्वत:हून काही नवीन कायदेशीर हक्क निर्माण करीत नाही. ती ग्राहकांना म्हणजेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सेवा उपभोगणाऱ्यांना जादा हक्क मांडण्यासाठी मदत करते.

**५. नागरिकांच्या सनदेची अमंलबजावणी :-**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी दिनांक १ जून २००७ पासून करण्यास विभाग कटिबध्द आहे. सनदेस व्यापक प्रसिध्दी देऊन नागरिकांच्या प्रतिक्रिया/ अभिप्राय मागविण्यात येतात व त्यांच्या सूचनांचा यथोचीत आदर करुन आवश्यक बदल करण्यात येतात.

हा विभाग खात्रीपुर्वक गुणवत्तेची सेवा पुरविण्याची हमी देत आहे. ग्राहक सेवेची उद्दिष्टे प्राधान्याने अंगीकारुन ग्राहकांना त्वरीत प्रतिसाद दिला जाईल. विभागाच्या कुठल्याही माहितीसाठी नागरिकांना सौजन्यपुर्ण व मदत करण्याच्या भावनेने वर्तणूक मिळेल. कार्यपध्दती अधिक लोकाभिमुख, सुलभ व आटोपशीर करण्यासाठी नागरिकांचा सल्ला घेतला जाईल. भ्रष्टाचारास आळा घालण्यात येईल. तसेच नागरिकांच्या गाऱ्हाण्यांचे कालबध्द निराकरण करण्यात येईल.

**६. परिशिष्टे :-**

अ) कार्यालये दर्शविणारा वृक्ष तक्ता

**(Tree-Chart)**


ब) कार्यक्षेत्राचा नकाशा.








# MAP OF SINDHUDURG




मुख्य अभियंता, विशेष प्रकल्प, सा.बां.विभाग, मुंबई
अधीक्षक अभियंता, मुंबई बांधकाम मंडळ, चेंबूर
अधीक्षक अभियंता, मुंबई रस्ते विकास व संकल्पचित्र मंडळ, बांद्रा
किनारी अभियंता, बांद्रा, मुंबई
अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, वरळी, मुंबई.
पत्तन अभियंता, पत्तन अभियांत्रिकी विभाग, नवी मुंबई
पत्तन अभियंता, रत्नागिरी पत्तन विभाग, रत्नागिरी
पत्तन अभियंता, सिंधुदुर्ग पत्तन विभाग, कुडाळ, मु.सिंधुदुर्गनगरी
सहाय्यक पत्तन अभियंता देवगड
सहाय्यक पत्तन अभियंता मालवण
सहाय्यक पत्तन अभियंता वाघोटन
सहाय्यक पत्तन अभियंता वेंगुर्ला